वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-गुरुवार दि. १३ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# धनंजय मुंडेपासून अजित पवारांनी सांभाळून राहावं

## त्यांना बळ देऊ नये; दोघेही सोबत जावू नार्को टेस्ट करायचीच;मनोज जरांगे भडकले



Email:- dailydivyawarta@Gmail.com

Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

जालना, (वृत्तसेवा):- मला जीवे मारण्याचा कट रचला. नार्को चाचणी करण्याची मागणी केली. धनंजय मुंडे माझ्या घातपात करण्यापर्यंत गेले. आता सुट्टी नाही. आता लपायचे नाही. दोघेही सोबत जाऊ, अशी भूमिका मांडत मनोज जरांगे पाटील उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरही भडकले. 'त्याला पाठवा नाही तर २०२९ ला तुमची फजिती होईल', असा इशारा जरांगे पाटलांनी अजित पवारांना दिला.

मनोज जरांगे पाटलांचा हत्येचा कट रचल्याच्या प्रकरणाचा पोलीस तपास सुरू आहे. यात काही जणांना अटक झाली असून, धनंजय मुंडे यांच्या जवळचे कांचन साळवी यालाही पोलिसांनी अटक केली. या प्रकरणावरून धनंजय मुंडे आणि मनोज जरांगे पाटील यांच्यात आरोप-प्रत्यारोपांचे युद्ध सुरू आहे. त्यातच धनंजय मुंडे यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत स्टार प्रचारकांच्या यादीत स्थान देण्यात आले आहे.

धनंजय मुंडे यांना पक्षाकडून स्टार प्रचारक करण्यात आले आहे. त्याबद्दल जेव्हा मनोज जरांगे पाटील यांना विचारण्यात आले, तेव्हा ते म्हणाले, धनंजय मुंडेला डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत पाठवलं तरी माझी हरकत नाही. त्याला आधी तपासणीसाठी पाठवावे.

▶▶ पान २ वर

# भ्रष्टाचारविरोधी मोहिमा राबवणारा अधिकारीच अडकला लाच घेतांना

बीड , (दिव्य न्युज):- लाचलुचपत प्रतिबंधक विभागात भ्रष्टाचारविरोधी मोहिमा राबवणारा अधिकारीच स्वतः लाच घेताना अडकला, अशी अभूतपूर्व घटना घडली आहे. बीड एसीबी कार्यालयात कार्यरत सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर भीमराज कुकलारे यांना एसीबीनेच सापळा रचून अटक केली असून, संपूर्ण पोलिस दलात यामुळे खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कुकलारे हे काही महिन्यांपूर्वी धाराशिव जिल्ह्यातील एका पोलीस ठाण्यात ठाणेदार म्हणून कार्यरत होते.त्या काळात त्यांनी एका नागरिकाकडून विशिष्ट प्रकरणात सकारात्मक कार्यवाहीसाठी आर्थिक व्यवहाराची मागणी केली होती. सदर नागरिकाने ही बाब थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रारीच्या स्वरूपात मांडली.त्यानंतर एसीबीच्या औरंगाबाद विभागाने गोपनीय तपास सुरू करून सापळा रचला. ठरल्याप्रमाणे लाच स्वीकारताना कुकलारे यांना रंगेहाथ पकडण्यात आले.स्रोतांनुसार, कुकलारे यांनी २५,००० ते ३०,००० इतक्या रकमेसाठी मागणी केली होती.

▶▶ पान २ वर

# पिपाणी चिन्ह निवडणूक आयोगाने वगळले

## शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा आयोगाने राखला मान



मुंबई, (दिव्य न्युज):- राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाला लोकसभा, विधानसभा निवडणुकीत तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हाला साधर्म्य नाव असणाऱ्या पिपाणी (ट्रम्पेट) चिन्हामुळे फटका बसला होता. लोकसभा निवडणुकीत तुतारी ऐवजी पिपाणीला हजारांपासून लाखांपर्यंत मते तर विधानसभा निवडणुकीत ९ उमेदवार पडल्याचा दावा राष्ट्रवादीकडून करण्यात आला होता. लोकसभेपासून पिपाणी हे चिन्ह गोठविण्याची मागणी शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून करण्यात येत होती. अखेर निवडणूक आयोगाने ही मागणी मान्य करीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पिपाणी हे चिन्ह वगळले आहे, यामुळे राष्ट्रवादीला (शरद पवार) दिलासा मिळाला आहे.

पिपाणी या चिन्हाला निवडणूक चिन्हांच्या यादीत 'तुतारी' नाव होते. या नामसाधर्म्यामुळे शरद पवार गटाला मिळणारी मते अपक्ष उमेदवारांना मिळाल्याचा दावा राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाकडून करण्यात आला होता. त्यामुळे निवडणूक आयोगाला तशी मागणीही करण्यात आली होती. मात्र आयोगाकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नव्हता. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ही मागणी मान्य करण्यात आली. आयोगाने आपल्या १९४ मुक्त चिन्हांच्या यादीतून पिपाणी (ट्रम्पेट) हे चिन्ह वगळले आहे.

### अपक्षांकडून पिपाणी चिन्हाची मागणी

लोकसभा निवडणुकीत पिपाणीला मोठ्या प्रमाणावर मतदान झाल्यामुळे विधानसभा निवडणुकीत अपक्षांकडून पिपाणी चिन्हाची मागणी करण्यात आली होती. विशेषत: शिरूर, बारामती, सातारा, भिवंडी, दिंडशेरी, रावेर, अहिल्यानगर, बीड या मतदारसंघात पिपाणीला पसंती

▶▶ पान २ वर

# पाली जिल्हा परिषदच्या अनुषंगाने बप्पासाहेब घुगे यांची बोरफडी येथे बैठक

## बप्पासाहेब घुगे यांना निवडून देण्याचा बोरफडी गावाचा निर्धार

बीड , (दिव्य न्युज):- बीड तालुक्यातील पाली जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत बोरफडी येथे ग्रामस्थांच्या उपस्थितीत भव्य बैठक संपन्न झाली. या बैठकीत बप्पासाहेब घुगे यांचा गेल्या निवडणुकीत थोड्या मताने पराभव झाला असला तरी या होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीत विजयी करण्याचा ठाम निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला.बैठकीदरम्यान गावातील ज्येष्ठ नागरिक, युवक वर्ग, तसेच महिलांनी ही उत्स्फूर्त

▶▶ पान २ वर



# बीडध्ये नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराची घोषणा कधी होणार?

## वीस दिवसांवर निवडणूक आली, संभ्र कायम

**बीड, (दिव्य न्युज):- नगर पालिका निवडणूकीची रणधुाळी सर्वच ठिकाणी सुरूझाली असून गेवराईध्ये भाजपा आणि राष्ट्रवादीने नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सर्वात आधी जाहिर केले आहेत. हे दोन्ही ही उमेदवार प्रचारालाही लागले आहेत. जिल्ह्यामध्ये सर्वात मोठी नगर पालिका म्हणून आणि सर्वात जास्त मतदान असलेले शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बीड नगर पालिकेच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराची घोषणा अद्याप कोणत्याही पक्षाकडून करण्यात आली नाही.मुळातच पक्ष स्वतंत्र लढणार की महायुती किंवा आघाडी होणार हे देखिल अद्याप स्पष्ट झाले नाही. सर्वच पक्षांनी स्वतंत्र तयारी सुरु केली आहे.**

कोणत्याही पक्षाने अद्याप नगराध्यक्ष पदाचा उमेदवार कोण असेल? हेस्पष्ट केलेले नाही. नगरसेवकांच्या बाबतीतही केवळ आ.संदीप क्षीरसागर यांनी आपल्या संभाव्य उमेदवारांना वार्डात तयारीला लागण्याच्या सुचना केल्या. तीन ते चार वार्डात उमेदवारही जाहिर झाले आहेत. मात्र इतर पक्षाकडून अद्याप कोणत्याही उमेदवारा संदर्भात घोषणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे २० दिवसांवर निवडणूक आली असली तरी सर्वच उमेदवारांबाबत अद्यापही संभ्र कायम आहे.बीड जिल्ह्यातील नगरपालिकांच्या आगामी निवडणुकीसाठी राजकीय वातावरण सध्या खूप सक्रिय झाले आहे. नगराध्यक्षपदासाठी उमेदवारांची नावे अद्याप निश्चित झालेली नसली तरी सर्व प्रमुख पक्षांत उत्सुकता आणि गती दिसून येत आहे.स्थानीय निवडणूक कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुक उमेदवार अर्ज सादर करण्यासाठी संपर्क साधत आहेत, मात्र अर्ज भरण्यासाठी एबी फार्मची आवश्यकता आहे की नाही, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. त्यामुळे अनेक उमेदवारांनी अधिक माहिती मिळवण्यासाठी निवडणूक कार्यालयाशी संपर्क साधण्यास सुरुवात केली आहे. सर्वच पक्षांनी स्वतंत्र उमेदवार दिले तर पुन्हा ही निवडणूक क्षीरसागर विरूध्द क्षीरसागर अशीच होण्याची शक्यता आहे. अनेक पक्ष या निवडणूकीत स्वतंत्र उतरणार असल्याने भाजपा, शरद पवार राष्ट्रवादी, अजित पवार राष्ट्रवादी, शिंदे शिवसेना, एमआयएम

▶▶ पान २ वर

# बीड नगराध्यक्ष पदासाठी एमआयएमची उमेदवारी जाहीर



## श्रृंगारे सुरेखा हर्ष हे राहणार बीडचे एमआयएमचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार

बीड (दिव्य न्युज):- बीड नगरपालिकेच्या महिला अनुसूचित जातीसाठी आरक्षित नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर सर्वच राजकीय पक्षांकडून उमेदवार शोधाचे प्रयत्न सुरू होते. आज अखेर ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एमआयएम) पक्षाने आपल्या उमेदवाराची घोषणा केली असून वाजेद इनामदार यांना बीड नगराध्यक्ष पदासाठी अधिकृत उमेदवार म्हणून घोषित करण्यात आले आहे.

वाजेद इनामदार हे बीड शहरातील बार्शी नाका मोमिनपुरा परिसरातील रहिवासी असून ते सर्वसामान्य कुटुंबातील आहेत. समाजसेवेत सातत्याने कार्यरत राहून त्यांनी शहरातील सर्वच समाजघटकांमध्ये आपली ओळख निर्माण केली आहे. सर्व जाती-धर्मातील नागरिकांना आणि युवकांना सोबत घेऊन काम



करणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे.नगराध्यक्ष पदासाठी मुस्लिम समाजाचे मतदान निर्णय ठरणार असून याच मतावर बीड नगराध्यक्ष ठरणार असल्याची चर्चा बीड शहरात होत आहे.एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शफिक भाऊ यांच्या नेतृत्वाखाली इनामदार यांची उमेदवारी निश्चित करण्यात आली. पक्षातील युवा कार्यकर्त्यांचा त्यांना मोठा पाठिंबा असून, या पाठिंब्याच्या जोरावर त्यांची ही निवडणूक अधिक दमदार होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# बोगस शिक्षक भरतीतील घोटाळेबाजांना दणका

## आष्टीतील प्रकरणात बीड माध्यमिकचे तत्कालीन शिक्षणाधिकारी, तत्कालीन शिक्षण उपसंचालक, मुख्याध्यापक, शिक्षकांसह अठरा जणांवर गुन्हा दाखल, घोटाळेबाजांचे धाबे दणाणले



बीड, (दिव्य न्यूज) : बनावट कागदपत्रांच्या आधारे बोगस शिक्षक भरती करून एका शिक्षकाला काही काळ काम केल्यानंतरही नियमबाह्यपणे बडतर्फ करण्यात आले. यानंतर या शिक्षकाने न्यायालय, माहिती आयोगाकडे दादा मागितली, चौकशीत कागदपत्रांवरून बोगस भरती झाल्याचे समोर आल्यानंतर याप्रकरणी संस्थेचे पदाधिकारी, बोगस शिक्षकांसोबतच छत्रपती संभाजीनगरचे तात्कालिन शिक्षण उपसंचालक, बीड माध्यमिकचे तात्कालिन शिक्षणाधिकाऱ्यांसह १८ जणांविरोधात आष्टी पोलिस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यामुळे शिक्षण विभागातील

▶▶ पान २ वर

### या अठरा जणांवर झाला गुन्हा दाखल

बीड माध्यमिकचे तात्कालिन शिक्षणाधिकारी, छ. संभाजीनगरचे तात्कालिन शिक्षण उपसंचालकांसह मुख्याध्यापक तुकाराम डोके, लिपीक कल्याण पोकळे, संस्थेचे सदस्य नानासाहेब घोलप, श्रीनिवास पोकळे, विजयकुमार मुटकुळे, अमृता नवले, जयश्री काळे, मंगल बोरूडे, सतिश जगताप, तात्याभाऊ पोकळे, अनिल ढोबळे, शोभा जीवे, शितल पोकळे, सुनिता पोकळे, बाबासाहेब वाडेकर, अनुराधा भगत यांच्यावर गुन्हा नोंद झाला आहे.

# मौलाना अबुल कलाम आझाद



११ नोव्हेंबर १८८८-२३ फेब्रुवारी १९५८) हे एक भारतीय प्रमुख राजकीय पुढारी होते. त्यांचे मूळ नाव मोहिउद्दीन अहमद असे असून अबुलकलाम म्हणजे वाचस्पती ही त्यांची पदवी होती. पुढे 'आझाद' (स्वतंत्र) हे टोपणनावही त्यांना ही उपाधि मिळाली. त्यांचा जन्म मक्केला झाला. वडिलांबरोबर १८९० साली ते कलकत्याला आले. पारंपरिक मुसलमानी शिक्षणपद्धतीप्रमाणे मौ. आझादांनी फार्सी, उर्दू व अरबी या भाषांचे प्रथम अध्ययन करून नंतर तर्कशास्त्र, इस्लाम धर्म, तत्त्वज्ञान व गणित ह्यांचा अभ्यास केला. पुढे सर सय्यद अहमदखान ह्यांच्या लेखांचा परिणाम होऊन मौलानांनी इंग्रजीचा अभ्यास स्वतंत्रपणे सुरू केला.१९०८ मध्ये ईजिप्त, अरबस्तान, तुर्कस्तान, फ्रान्स इ. देशांना त्यांनी भेटी दिल्या. तेथील क्रांतिकारकांच्या संपर्कामुळे त्यांची राजकीय मते बदलू लागली आणि कलकत्त्यास परत येताच हिंदी मुसलमानांनी स्वातंत्र्यसंग्रामात पुढाकार घ्यावा, हे मत त्यांनी प्रतिपादिले. लोकजागृतीसाठी १९१२ साली कलकत्ता येथे त्यांनी अल्-हिलाल हे उर्दू साप्ताहिक सुरू केले. अनेक वृत्तपत्रांतून 'आझाद' ह्या टोपणनावाने ते लेखन करीत. अल्-हिलालमधील प्रखर राजकीय टीकेमुळे ब्रिटिश सरकारने त्यांच्याकडून १०,००० रुपयांचा जामीन मागितला. आझादांनी तो दिला नाही, म्हणून ते वृत्तपत्र बंद पडले. १९१५ साली त्यांनी अल्-बलाघ हे दुसरे वृत्तपत्र काढले. त्यामुळे आझादांना अनेक प्रांतांत जाण्यास बंदी घालण्यात आली; पुढे त्यांना सांचीला स्थानबद्ध करण्यात आले. मुसलमानांत त्यांच्या अटकेमुळे नवे वारे संचारले. १९२० साली त्यांची सुटका झाली. ते असहकाराच्या चळवळीत सामील झाले. १९२१ मध्ये पुन्हा त्यांना अटक करण्यात आली; पण एका वर्षानंतर त्यांना मुक्त करण्यात आले; १९२३ च्या दिल्ली येथील काँग्रेसच्या विशेष अधिवेशनाचे ते अध्यक्ष झाले. १९३० मध्ये त्यांना पुन्हा कैद झाली. ह्या वेळी मुसलमान जमातीस सत्याग्रहात सामील करून घेण्याचे मुख्य श्रेय आझादांनाच मिळाले. आझाद १९३९ ते ४६ पर्यंत काँग्रेसचे अध्यक्ष होते. १९४२ च्या चले जाव आंदोलनाच्या वेळी त्यांना पुन्हा तुरुंगवास भोगावा लागला. १९४५ साली सर्व नेत्यांबरोबर त्यांची सुटका झाली. १९४२ ची क्रिप्सयोजना, १९४५ ची वेव्हेलची सिमला परिषद व १९४६ मधील ब्रिटिश मंत्र्यांचे शिष्टमंडळ इ. प्रसंगीच्या सर्व वाटाघाटींत काँग्रेसतर्फे अध्यक्ष ह्या नात्याने त्यांनीच पुढाकार घेतला. स्वातंत्र्यानंतर ते केंद्रीय मंत्रिमंडळात सामील झाले आणि अखेरपर्येत शिक्षणमंत्री म्हणून राहिले. आझाद प्रभावी वक्ते होते. त्यांचे इंग्रजी, उर्दू, अरबी व फार्सी भाषांवर चांगले प्रभुत्व होते; त्यांनी अनेक वृत्तपत्रांतून स्फुट लेखन केले आणि उर्दूत काही पुस्तके लिहिली आहेत. त्यांतील तजकेरा,गुब्बारे खातिर्, कौले फैसल, दास्ताने करबला, तरजुमानुल कोरान ही प्रसिद्ध आहेत. तरजुमानुल कोरान म्हणजे कुराणचा सटीप उर्दू अनुवाद असून तो फार लोकप्रिय आहे. ह्याशिवाय त्यांचे इंडिया विन्स फ्रीडम (१९५९) हे आत्मचरित्र त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाले आहे; मात्र त्यातील अप्रकाशित तीस पाने १९८८ मध्ये प्रसिद्ध करण्यात येतील. त्यांची भाषणेही पुस्तकरूपाने अलीकडे प्रसिद्ध झाली आहेत.

# शिरूरमध्ये अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टवर कारवाई

शिरूर कासार, (दिव्य न्यज):- तालुक्यातील दहीवंडी शिवारात ट्रॅक्टरच्या साहाय्याने अवैध वाळूची वाहतूक होत असल्याची माहिती महसूल प्रशासनाला मिळताच मंगळवार (दि.११) रोजी रात्री १२:३० च्या सुमारास कारवाई करत ५०,५००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

बीड जिल्हात मागील काही दिवसांपासून अवैध वाळू वाहतुकीवर महसूल,पोलीस प्रशासनाच्या वतीने कारवाईचा सपाटा सुरु असून देखील अवैध वाळू वाहतूक सुरूच आहे.शिरूर कासार पोलीस ठाण्याच्या हाकेवर अंतरावर असलेल्या दहीवंडी शिवारात अवैध वाळूची वाहतूक करताना संदीप नारायण आघाव (वय ४५) रा.दहीवंडी ता.शिरूर कासार जि.बीड याच्यावर महसूल प्रशासनाने मंगळवार (दि.११) रोजी रात्री १२:३० च्या सुमारास कारवाई केली यात स्वराज कंपनीचे ट्रॅक्टर क्र.एमएच २९ सी ३४७२ व विना नंबरची ट्रॉली त्यात एक ब्रास वाळू असा एकूण ५०,५००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून शिरूर कासार पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांना बोलावून सदरील ट्रॅक्टर त्यांच्या ताब्यात देण्यात आला.कृष्णा रत्नपारखे यांच्या फिर्यादीवरून बुधवार (दि.१२) रोजी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.सदरील कारवाई नायब तहसीलदार गणेश दहिफळे, मंडळ अधिकारी सानप ,ग्राममहसूल अधिकारी कृष्णा रत्नपारखे यांनी केली.



# बीड पोलिसांची जिल्हाभरात वाहतूक मोहीम; ११ लाखांचा दंड वसूल



बीड, (दिव्य न्युज):- जिल्हा पोलिस दलाने आज दि. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी बेशिस्त वाहनचालकांवर नियंत्रण व वाहतूक शिस्त प्रस्थापित करण्यासाठी विशेष मोहीम राबवली. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या संकल्पनेतून व जिल्हा वाहतूक शाखेच्या समन्वयातून ही मोहीम घेण्यात आली.

बीड जिल्ह्यातील पाडळशिंगी टोलनाका, बार्शी नाका बीड, साठे चौक वडवणी, केज टोल नाका, चुंभळी फाटा पाटोदा, गोमाळवाडा फाटा शिरूर, धारुर टोल नाका, बर्दापूर टोल नाका, परभणी टी पॉईंट माजलगाव, ईटके कॉर्नर परळी आणि आंभोरा चेक पोस्ट अशा ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली होती.या कारवाईत एकूण १३४० वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करून मागील प्रलंबित दंडासह एकूण ११,०८,९५० इतका दंड वसूल करण्यात आला.या मोहिमेचे मार्गदर्शन पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांनी केले. जिल्हा वाहतूक शाखा तसेच सर्व पोलीस ठाण्यांचे अधिकारी आणि अंमलदार यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

# एकाच रात्री दोन घरे फोडली दीड लाखाचा ऐवज लंपास

केज , (दिव्य न्युज):- अज्ञात चोरट्यांनी एकाच रात्री दोन घरे फोडून नगदी १ लाख २५ हजार रुपये व १५ हजार सहाशे रुपयांचे दागिने असा १ लाख ४० हजार सहाशे रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना सारूळ (ता. केज) येथे घडली. याप्रकरणी केज पोलिसात घरफोडीचा गुन्हा दाखल झाला आहे.

सारूळ येथील रविंद्र नारायण ढाकणे हे नवीन घरी झोपले होते. तर त्यांच्या जुन्या घराच्या एका रूमला कुलूप लावून दुसऱ्या रूममध्ये त्यांचे आई वडील झोपले होते. ११ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री २ ते ४ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या आईवडील व भाऊ झोपलेल्या रुमला बाहेरून काड्या लावून एका रुमचे कुलूप तोडून रूममध्ये प्रवेश केला. रूमची झडती घेऊन चोरट्यांनी गव्हाच्या कोठीत ठेवलेल्या ८ हजार सहाशे रुपयांच्या दोन तोळ्याच्या जुन्या सोन्याच्या गळ्यातील दोन पुतळ्या काढून घेतल्या. त्यानंतर चोरट्यांनी त्यांच्या घरापासून २०० फूट अंतरावर असलेल्या वालचंद चंद्रभान ढाकणे यांच्या घराकडे मोर्चा वळविला. वालचंद हे एका रुममध्ये आपल्या कुटुंबासह झोपले होते. तर दुसऱ्या रूमची कडी काढून आतमध्ये प्रवेश केला. या रूममध्ये आईस्क्रीम विकण्याच्या रिकाम्या डब्यात कांदा विक्रीचे आलेले १ लाख रुपये, कपाटात ठेवलेले १५ हजार रुपये, लोखंडी पेटीत ठेवलेले १० हजार रुपये, पाच हजार रुपयांची अंगठी, दोन हजार रुपयांच्या लहान बाळाच्या मनगट्या हा ऐवज घेऊन चोरटे पसार झाले. रवींद्र ढाकणे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला असून तपास जमादार उमेश आघाव हे करीत आहेत.

पान ४ वरून

## आमदार सुरेश

खूप आहेत. ती पारंपरिक प्रथाच आहे, त्याने कोठून पैसे आणले हे माहीत नाही. असा खुलासाही धस यांना करावा लागला होता. आता ऐन निवडणुकीच्या तोंडावर खोक्या ' एमपीडीए' अंतर्गत करण्यात आलेली कारवाई सबळ पुराव्या अभावी रद्द करण्यात आली आहे. गृह मंत्रालयाच्या सल्लागार समितीने सबळ पुरावे नसल्याचे सांगत पोलिसांनी केलेल्या स्थानबद्ध कारवाईतून त्याची मुक्तता करावी असे म्हटले आहे. हर्सूलच्या येथील मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक यांना पत्र लिहून ' खोक्या' मुक्त करण्याचे आदेश देण्यात आले आहे. शिरुर तालुक्यातील झंपेवाडी येथे खोक्या राहत असे. त्याने सुरेश धस यांना वाढदिवसाच्या दिलेल्या शुभेच्छांच्या ध्वनीफितीमुळे खोक्या चर्चेत आला होता. जून महिन्याच्या २५ तारखेला 'खोक्या'वर झोपडपट्टी दादा कायद्यान्वये कारवाई करण्यात आली होती.

## विघ्न संतोषी लोकांकडून

सुरू करण्यात आले. त्याचे कार्यारंभ आदेश ही पारित झाले आणि सदरील विकास काम पोलीस मुख्यालया पासून सुरू करण्यात आले मात्र रस्त्याचे खोदकाम सुरू असताना काही विघ्न संतोषी लोकांनी हे काम विरुद्ध दिशेने करा अशी मागणी करत अनेक वर्षापासून विकासापासून वंचित असलेले धानोरा रस्त्याचे विकास काम बंद पाडले आहे. या घटनेचा सर्व स्तरातून निषेध नोंदवण्यात येत असून बंद पाडलेले रस्त्याचे काम तात्काळ सुरू करा अशी मागणी संजय धुरंधरे यांनी बीड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्याकडे केली आहे.

## कवडगावातून

फटका बसला. यानंतर अशोक निपटे यांनी निराश न होता गावाच्या विकासाची वाट पकडली. सरपंच म्हणून आणि आता उपसरपंच म्हणून त्यांनी पिंपरखेडचा कायापालट केला. आमदार प्रकाशदादा सोळंके, धैर्यशील काका सोळंके आणि युवा नेते जयसिंग भैय्या सोळंके यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम केले. कवडगाव पंचायत समिती गणातील कवडगाव, मोरेवाडी, देवडी, खळवट, लिमगाव, काडीवडगाव, चिंचवडगाव, खापरवाडी आणि पिंपरखेड या गावांमध्ये निपटे यांचे नाव लोकांच्या मनात ठळकपणे आहे. त्यांच्या पत्रकारितेतील अनुभवामुळे प्रशासनात चांगली वचक असून, पंचवीस वर्षांच्या सातत्यपूर्ण समाजसेवेचा ठसा त्यांच्या कार्यावर उमटलेला आहे. मागील वेळेसची संधी हुकल्याने यावेळी मात्र अशोक निपटे यांनाच उमेदवारी मिळावी अशी जोरदार मागणी शेतकरी व सामान्य नागरिकांतून होत आहे. या जनभावनेचा विचार करून आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्याकडून निपटे यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता प्रबळ असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

पान १ वरून

## धनंजय मुंडेपासून

अजितदादा, तुमच्या मुलाचा घातपात केला असता, तर तुम्ही गप्प बसले असते का? पांघरुण का घालता. २०२९ ला याचा पश्चाताप होईल. त्याला पाठवा नाही तर २०२९ ला तुमची फजिती होईल, असा इशारा मनोज जरांगे पाटलांनी अजित पवारांना दिला. अजित पवार, तुम्हाला एक सांगतो त्याला चौकशीसाठी लवकर पाठवा. मला जीवे मारण्याचा कट रचला. नार्को टेस्टची मागणी मी केली नव्हती. धनंजय मुंडे माझ्या घातपातापर्यंत पोहोचले. आता लपायचं नाही. दोघेही सोबत जाऊ. नार्को टेस्ट करायचीच, आता सगळंच बाहेर येऊ द्या, असे जरांगे म्हणाले आहेत.

अजित पवारांनी सांभाळून राहावं -मनोज जरांगे

कांचन नावाचा त्यांचा माणूस, ज्याने या दोघांना घरातून परळीला नेले. ते परळीला गेले म्हणजे परळीत खुनाचा कट शिजला होता. धनंजय मुंडे आणि त्याच्या साथीदाराने मिळून हा कट रचला, सत्य उघड होणार आहे. अजित दादांनी सांभाळून राहावं. त्यांना बळ देऊ नये. प्रत्येकवेळी त्याला वाचवायचं नाही. हे मोठं षडयंत्र आहे. धनंजय मुंडेंनी या टोकापर्यंत जायला नको होतं, असेही मनोज जरांगे म्हणाले.

## भ्रष्टाचारविरोधी

एसीबीच्या अधिकाऱ्यांनी विशेष रासायनिक पावडर वापरून ट्रॅप ऑपरेशन यशस्वीरीत्या पार पाडले. लाच स्वीकारताना त्यांचे हात व कपडे रंग बदलल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.या प्रकरणात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अंतर्गत कलम ७, १२, १३(१)(व) व १३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.कुकलारे यांना अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले असून, विभागीय चौकशीसाठी निलंबनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.दरम्यान, एसीबीचे वरिष्ठ अधिकारी म्हणाले की, लाचखोरीविरोधी विभागात असणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यास माफी नाही. भ्रष्टाचाराविरुद्ध भूमिका एकसमान राहील. या कारवाईनंतर बीड व धाराशिव जिल्ह्यातील पोलिस वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे. एकीकडे लाचखोराला लाच घेताना पकडणे हा न्याय व पारदर्शकतेचा विजय असल्याची भावना व्यक्त होत आहे, तर दुसरीकडे एसीबीसारख्या संवेदनशील विभागात अशा अधिकाऱ्यांची उपस्थिती ही विभागासाठी काळजीची बाब आहे, अशी प्रतिक्रिया काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. सामाजिक माध्यमांवर नागरिकांनी तीव्र प्रतिक्रिया दिल्या आहेत. जनतेला न्याय देणारा अधिकारीच अन्याय करत असेल, तर सामान्य माणसाने कुणावर विशास ठेवायचा? असा प्रश्न अनेकांनी उपस्थित केला आहे.भ्रष्टाचाराविरोधातील मोहीम अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी ही घटना जागे करणारी घंटा ठरत आहे.एसीबीकडून मिळालेल्या माहितीनुसार, अशा प्रकरणांवर शून्य सहनशीलतेची धोरणात्मक भूमिका कायम राहील.

## पाली जिल्हा परिषदच्या

सहभाग नोंदवला.बप्पासाहेब घुगे हे सर्वसामान्यांच्या सुखदुःखात कायम सहभागी राहणारे नेते असल्याने त्यांच्याविषयी जनतेत विशेष आत्मीयता आहे, असेही मत या बैठकीत व्यक्त करण्यात आले. ग्रामविकासाच्या दिशेने घुगे यांचे नेतृत्व सक्षम असून, ते जनतेच्या मनात घर करून आहेत, असे मत या बैठकीत मांडण्यात आले. शेवटी सर्व उपस्थित ग्रामस्थांनी बप्पासाहेब घुगे यांना निवडून देऊ, विकासाचा संकल्प पूर्ण करू असा नारा देत निवडणूक लढाईसाठी एकजूट दाखवली.

## पिपाणी चिन्ह

मिळाली होती. त्याचप्रमाणे जिंतूर, घनसावंगी, शहापूर, बेलापूर, अणुशक्तीनगर, आंबेगाव, पारनेर, केज, परांडा या मतदारसंघांत शरद पवारांच्या पक्षाचा उमेदवार जितक्या मतांनी पाराभूत झाला. त्यापेक्षा अधिक मते पिपाणी चिन्ह असलेल्या अपक्षा उमेदवारांना मिळाली होती. ही मते विभाजित झाली नसती तर शरद पवारांच्या पक्षाचे १९ आमदार निवडून आले असते, असा दावा करण्यात आला होता.

लोकसभेत फटका

रावेर, दिंडोरी, भिवंडी, बारामती, शिरुर, अहमदनगर, बीड, सातारा या जागांवर पिपाणी या चिन्हांवर निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना हजारांनी मते मिळाली होती. रावेर या जागेवर पिपाणी चिन्हावर निवडणूक लढवणारे एकनाथ साळुंके यांना ४३ हजार ९५७ मते, दिंडोरीत बाबू भगरे (सर) यांना १ लाख ३ हजार ६३२ मते, भिवंडीत कांचन वखरे यांना २४ हजार ६२५ मते, बारामतीत शेख सोएलशहा यांना १४ हजार ९१७ मते मिळाली. शिरूरमध्ये मनोहर वाडेकर यांना २८ हजार ३२४, अहमदनगरमध्ये गोरख आळेकर यांना ४४ हजार ५९७, बीडमध्ये अशोक थोरात यांना ५४ हजार ८५० मते, साताऱ्यात संजय गाडे यांना ३७ हजार ६२ मते मिळाली होती. सातारा लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादीचे विद्यमान प्रतेशाध्यक्ष शशिकांत शिंदे उभे राहिले होते. त्यांचा ३२ हजार मतांनी पराभव होऊन उदयनराजे भोसले विजयी झाले.

## बोगस शिक्षक भरतीतील

घोटाळेबाजांचे धाबे दणाणले आहेत. आष्टीतील तुकाराम गर्जे यांनी याप्रकरणी तक्रार दिली. ते रूरल डेव्हलपमेंट सेंटर फॉर युथ, अहिल्यानगर या संस्थेच्या वतीने आष्टी तालुक्यातील बीडसांगवी येथे चालणाऱ्या नेताजी सुभाषचंद्र बोस माध्यमिक शाळेवर शिक्षक म्हणून कार्यरत होते. मात्र संस्थेने त्यांना बडतर्फ केले. याप्रकरणी तक्रार दिली की, संस्थेने शाळेत चुकीच्या पध्दतीने शिक्षक भरती केली, भरतीची जाहिरात येण्याच्या आधीच शिक्षकांना रूजू करून घेतले होते. दोन शिक्षीका या शाळेतच येत नसतानाही त्यांच्या घरी जावून त्यांच्या सह्या घेत त्यांना पगार दिला जात होता. याबाबत त्यांनी अनेकदा तक्रारी केल्या, माहिती अधिकारात माहिती मिळविली व न्यायालयातही धाव घेतली. कशाप्रकारे बोगस शिक्षक भरती केली गेली तसेच बनावट कागदपत्रांआधारे गर्जेना बडतर्फ केले याची माहिती दिली होती, यावरून १८ घोटाळेबाजांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये बीडच्या माध्यमिकचे तात्कालिन शिक्षणाधिकारी, छ. संभाजीनगरचे तात्कालिन शिक्षण उपसंचालांचाही समावेश आहे. दरम्यान या गुन्ह्यामुळेच शिक्षण विभागातील घोटाळेबाजांचे धाबे आता दणाणले आहेत.

## बीडध्ये नगराध्यक्ष

आदी पक्ष स्वतंत्रपणे उमेदवार उभे करणार आहेत. त्यामुळे नगर पालिकेत नगराध्यक्ष पदाची निवडणूक चुरसीची होणार आहे. चौरंगी लढत झाली तर त्याचा फायदा कोणाला आणि फटका कोणाला? या संदर्भात राजकीय विश्लेषक वेगवेगळ्या पध्दतीने विश्लेषण करत आहेत. सर्वच राजकीय पक्षांकडून केवळ आढावा बैठका घेणेच चालू आहे. वार्डातील प्रभागा प्रभागामधील नगरसेवक आप आपल्या परीने संपर्क प्रचार करीत असून नेत्यांकडून असे स्पष्ट आदेश न आल्याने कधी काय होईल या संदर्भात देखिल संभ्राचे वातावरण आहे. राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे की, पक्षांतर्गत चर्चा आणि इच्छुक उमेदवारांची तयारी पाहता नगराध्यक्षपदासाठी स्पर्धा तीव्र होईल. अनेक पक्ष आपापल्या योग्य उमेदवारांची निवड करण्यासाठी जोरदार प्रयत्न करत आहेत, तर इच्छुक उमेदवारही आपल्या तयारीत आहेत.संपर्कात असलेल्या पक्ष प्रतिनिधींनी सांगितले की, सर्व पक्ष नगराध्यक्षपदासाठी योग्य उमेदवारांची निवड करण्याच्या प्रक्रियेत आहेत. इच्छुक उमेदवारांसोबत संपर्क साधून त्यांची तयारी पाहिली जात आहे.एकंदर पाहता, बीड जिल्ह्यातील राजकीय वातावरण आगामी निवडणुकीसाठी गतिशील असून, लवकरच उमेदवारांची यादी स्पष्ट होईल आणि नगराध्यक्षपदासाठी होणारी स्पर्धा सर्वांसमोर येईल.

## शिरूरमध्ये अवैध

५०,५००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून शिरूर कासार पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांना बोलावून सदरील ट्रॅक्टर त्यांच्या ताब्यात देण्यात आला.कृष्णा रत्नपारखे यांच्या फिर्यादीवरून बुधवार (दि.१२) रोजी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.सदरील कारवाई नायब तहसीलदार गणेश दहिफळे, मंडळ अधिकारी सानप ,ग्राममहसूल अधिकारी कृष्णा रत्नपारखे यांनी केली.